# ज्येष्ठ नागरिक संघटनेची मासिक सभा संपन्न

जळगाव । प्रतिनिधी

चैतन्य नगर जेष्ठ नागरिक संघात दि ३१ जुलै २०२५ रोजी संपन्न झाली. मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दत्तात्रय चौधरी, माजी अध्यक्ष फेस्कॉम मुंबई , प्रमुख पाहुणे म्हणून गांधी रिसर्च फाउंडेशनचे सहकारी मदन लाठी यांच्यासह अॅड. अरुण धांडे, भागवत पाटील उपस्थित होते.

प्रथम सानेगुरुजी लिखित खरा तो एकची धर्म प्रार्थना सौ भारती पाटील, सौ सरला बोरोले, डॉ विजया तळेले, यांनी सादर केली. यावेळी सायबर क्राईम विषयी कवयत्री बहिणाबाई उ म विद्यापीठ जळगाव, सायबर सेल पुणे, व क्रीक हिल फौंडेशन, द्वारा पुरस्कृत वैशाली सतीश पाटील,स्नेहल संजय पाटील, अस्मिता ईश्वर पाटील, साक्षी तानाजी पाटील यांनी सायबर क्राईम संबंधी पथनाट्य द्वारे माहिती आणि आजच्या काळात होणारी फसवणूक आणी त्या संबंधी घ्यावयाची काळजी हे सर्व सविस्तर सांगुन आपण आपला बचाव कसा करु शकतो हे नाटीके द्वारे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा पाटिल यांनी तर आभार प्रा शालिनी सोनावणे यांनी मानले.